# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk२a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २अ/एडीएम/२०१६/१०००
दिनांक : 30 JUL 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / नागपूर / अमरावती

विषय : थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या उपलब्ध जागा कळविण्याबाबत...

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे वतीने या संचालनालयाकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येणार आहेत. याकरिता विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करणे,विकल्प अर्ज सादर करणे, प्रवेशाचे ॲलॉटमेंट आणि प्रवेश निश्चिती या प्रक्रिया Online Application System नुसार संचालनालयाकडून करण्यात येणार आहे. थेट द्वितीय वर्षासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून उपलब्ध करावयाच्या जागांची गणना कशी करावी याची सविस्तर माहिती शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी प्रसिध्द केलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीतील Shedule II मध्ये नमूद केली आहे.

थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी संस्थांकडे उपलब्ध असलेल्या रिक्त जागा कळविण्यासाठी संस्थेने त्यांच्या संस्थेचा कोड क्रमांक व संचालनालयाकडून देण्यात आलेला पासवर्ड चा उपयोग करून ऑनलाईन पध्दतीने रिक्त जागा भरणे आवश्यक आहेत. संस्थेतील अंतर्गत अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांच्या बदल्या करून रिक्त असलेल्या जागा ऑनलाईन पध्दतीने भरून झाल्यानंतर ऑनलाईन रिपोर्ट उपलब्ध होईल तो रिपोर्ट संबंधित विभागीय कार्यालयांकडे जाऊन संस्थेने कन्फर्म करणे जरुरीचे आहे. याबाबत काही अडचणी उद्भवल्यास विभागीय कार्यालये किंवा संचालनालयास मेसेजबॉक्सद्वारे कळविण्याची सुविधा उपलब्ध आहे. विनाअनुदानीत बिगर अल्पसंख्यांक संस्थांनी त्यांच्याकडील रिक्त जागांच्या संख्या कळविणे आवश्यक आहे. तसेच या रिक्त जागा कळविताना संचालनालयाचे पत्र क्रामंक २/एनजीपी/(संस्था-पाठयक्रम बदल)/२०१६/८१९, दिनांक २२.६.२०१६ अन्वये मुद्दा ३ मध्ये कळविल्यानुसार थेट द्वितीय वर्षासाठीच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध जागा प्रदर्शित करण्यापूर्वी ज्या उमेदवारांचे अभ्यासक्रमबदल केल्यामुळे /संस्थाबदलासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यामुळे उपलब्ध होणा-या जागा विचारात घेऊन त्यानुसार रिक्त जागांची माहिती अद्ययावत करण्यात यावी.

संस्थांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या सर्व जागांची माहिती ऑनलाईन पध्दतीने बिनचुकपणे भरणे आवश्यक आहे. एकदा भरलेली माहिती बदलवता येणार नाही याची नोंद घ्यावी. संस्थांनी उपलब्ध जागांची माहिती भरून ती कन्फर्म झाल्यावर संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध जागांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध केलेल्या जागांची माहिती प्रसिध्द करण्यात येईल. ती माहिती प्रत्येक संस्थेने पडताळणी करून दर्शविलेल्या जागा

योग्य असल्याचे प्रमाणपत्र संस्थाप्रमुखांच्या सही शिक्क्यानिशी संबंधित विभागीय कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

विभागीय कार्यालयांनी संस्थाबदल किंवा अभ्यासक्रम बदल केलेल्या / तदनंतर रुजू झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती विचारात घेऊन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध रिक्त जागांची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून संस्थाबदलास मान्यता दिल्याच्या प्रकरणी संबंधित संस्थांच्या रिक्त जागांमध्ये बदल संचालनालय स्तरावरून दर्शविण्यात येईल. याबाबतचा अहवाल संस्थांना लॉग इन द्वारे उपलब्ध आहे.

संचालनालयाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध जागांची माहिती योग्य असल्याची खात्री प्रत्येक संस्थेने घेणे आवश्यक असून या माहितीमध्ये तफावत आढळल्यास शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीनुसार कारवाई करण्यात येईल व त्यास संबंधित संस्था जबाबदार असेल याची नोंद घेण्यास सर्व संस्थांना कळविण्यात यावे.

रिक्त जागा कळविण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचा प्रकार | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | Online पध्दतीने केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेसाठी उपलब्ध रिक्त जागांची माहिती भरून निश्चित करणे | ३०.०७.२०१६ |
| २ | Online पध्दतीने संस्थांकडून उपलब्ध रिक्त जागांची पडताळणी करून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेल्या जागांची विभागीय कार्यालयाकडून निश्चिती करणे | ३०.०७.२०१६ व ०१.०८.२०१६ |

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

१. मा.आयुक्त मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई
२. सर्व शासकीय /शासकीय अनुदानीत/ विद्यापीठ नियंत्रित / विद्यापीठ व्यवस्थापित / विनाअनुदानीत अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था)
३. कार्यासन क्रमांक २,मुख्य कार्यालय,मुंबई यांना कळविण्यात येते की, संचालनालय स्तरावरून विद्यार्थ्यांच्या संस्थाबदल करण्यात येणा-या प्रकरणी रिक्त जागांची स्थिती बदलण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी
४. माहिती व तंत्रज्ञान कक्ष, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय,मुंबई यांना माहितीसाठी